(१५१)

D:\RB A-3\Encroachments.doc

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एस-३०/२८०९/प्र.क्र.७१/ज-४, दि.७/१२/२०११.

२) शासन, महसूल व वन विभागाकडील शुध्दीपत्रक क्र. एस-३०/२८०९/प्र.क्र.७१/ज-४, दि.०१/०२/२०१२.

३) तहसीलदार मुरुड यांच्याकडील पत्र क्र.जमीन/कात-१/विक्रम इस्पात/११, दि.२२/७/२०११.

४) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडील पत्र क्र.मशा/कार्या-२/जमीन-१/कावि-११०४/२०११, दिनांक ११/०१/२०१२.

५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ५१ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ४३.

६) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक ०४/२/२०१२.

---

क्र.मशा/जमीन/अ-३/८१००५/२०१२
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय
अलिबाग, दिनांक०४/०२/२०१२.

## आदेश

२/- शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एस-३०/२८०९/प्र.क्र.७१ /ज-४ दिनांक ७/१२/२०११ तसेच शासन, महसूल व वन विभागाकडील शुध्दीपत्रक क्र. एस-३०/२८०९/प्र.क्र.७१/ज-४, दि.०१/०२/२०१२ अन्वये, तत्कालिन मा. अप्पर मुख्य सचिव (महसूल), महाराष्ट्र शासन यांनी पारीत केलेल्या दि. २५/९/२००८ रोजी पारित केलेल्या अर्धन्यायिक आदेशांप्रमाणे मे. विक्रम इस्पात कं.लि., साळाव,ता.मुरुड,जि.रायगड यांनी मौजे साळाव व निडी ता. मुरुड,जि.रायगड येथील शासकीय जमिनीवर औद्योगिक प्रयोजनासाठी केलेले खालीलप्रमाणे ९.६९.८० हे.आ. क्षेत्रावरील अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५१ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ४३ मधील तरतूदीनुसार या जमिनीची सन २००८ मधील बाजारमुल्याच्या एक पट रक्कम आकारुन शासन ज्ञापनामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मान्यता देण्यांत येत आली आहे. मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांजकडील दिनांक ११/०१/२०१२ च्या पत्रान्वये शासन ज्ञापनातील अटी व शर्ती व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अतिरीक्त अटींवर अतिक्रमण नियमानुकूल करण्याची पुढील कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

(क्र.पु.पा.)

## शासकीय जमिनीचे वर्णन

| अ.क्र. | गांवाचे नांव | स.नं. /हि.नं. | क्षेत्र (हे.आ.) | पैकी अतिक्रमित क्षेत्र (हे.आ.) |
|---|---|---|---|---|
| १ | साळाव | ७/१अ | ०.६९.१० | ०.६९.१० |
| २ | साळाव | ४८/१अ | ०.१३.०० | ०.१३.०० |
| ३ | साळाव | २३/३ अ | ३.७७.०० | ३.७७.० |
| ४ | साळाव | १८/१ अ | ०.८९.९० | ०.८९.९० |
| ५ | साळाव | २१/१ | ०.४५.९० | ०.४५.९० |
| ६ | साळाव | २१/२ अ/१ | ०.२०.३० | ०.२०.३० |
| ७ | साळाव | २१/९ | ०.२५.८० | ०.२५.८० |
| ८ | साळाव | २६/३अ | ०.३९.६० | ०.३९.६० |
| ९ | साळाव | ३०/२ अ | ०.२४.७० | ०.२४.७० |
| १० | साळाव | ४५/२ ब | ०.१३.०० | ०.१३.०० |
| ११ | साळाव | ४६/४ अ | ०.६७.१० | ०.६७.१० |
| १२ | साळाव | २२/१ | ०.१३.०० | ०.१३.०० |
| १३ | साळाव | १६/१ | ०.३५.०० | ०.३५.०० |
| १४ | साळाव | १२/१अ | ०.२५.३० | ०.२५.३० |
| १५ | साळाव | ७०/२अ | ०.२६.०० | ०.२६.०० |
| १६ | साळाव | ७०/२क | ०.११.०० | ०.११.०० |
| १७ | साळाव | ७०/४अ | ०.०८.३० | ०.०८.३० |
| १८ | साळाव | ५८/१अ | ०.६४.४० | ०.०४.०० |
| १९ | साळाव | ५१/० | ०.०२.०० | ०.०२.०० |
| २० | साळाव | ५७/२ | ०.०३.३० | ०.०३.३० |
| २१ | साळाव | ६६/१अ/अ१ | १०.१०.०० | ०.२५.०० |
| २२ | साळाव | १४/७ | ०.०१.०० | ०.०१.०० |
| २३ | साळाव | १४/९ | ०.००.५० | ०.००.५० |
| २४ | निडी | १८/० | ०.३०.०० | ०.३०.०० |
| | **एकूण** | | | ९.६९.८० |

३/- शासन,महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दिनांक ०७/१२/२०११ मधील आदेशानुसार वरील शासकीय जमिनीची सन २००८ मधील बाजारमुल्याच्या एक पट रक्कम आकारुन कंपनीचे वरीलप्रमाणे क्षेत्रावरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे. याचबरोबर महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ४३ (१) (अ) (एक) मधील तरतूदीनुसार अतिक्रमण संपूर्ण कालावधीचा उपकरासह अकृषिक आकार याची रक्कम आणि

(कृ.पु.पा.)

कलम ५०(२) प्रमाणे दंडाची रक्कम आकारणे आवश्यक आहे. तसेच कंपनीकडून अतिक्रमणाकामी या पूर्वी वसूल केलेली दंडाची रक्कम वजा करुन उर्वरित येणे रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

४/- तहसीलदार मुरुड यांनी दि.२२/०७/२०११ च्या पत्रान्वये सन २००८ च्या वार्षिक दर मुल्य तक्त्यातील प्रति चौ.मी. रुपये ३१०/- हा जमीन मुल्यांकन दर विचारांत घेऊन या जमिनींची दंडनीय रक्कम, अकृषिक आकार व त्याप्रमाणे कंपनीकडून येणे लागत असल्याचा तपशील प्रस्तावित करण्यांत आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचेकडील आदेशांनुसार महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ (सरकारी जमिनीचे वितरण), नियम १९७१ चे नियम ४३ (अ) मधील परंतुकानुसार (१ पट) | - | ३,००,६३,८००/- |
| २) अकृषिक आकार उपकरासह २० वर्ष १९८८-८९ ते २००७-०८ | - | ३,७१,८६८/- |
| ३) अकृषिक आकारणी २००८-०९ ते २०१०-११ ३ वर्ष | - | ४,३६,४१०/- |
| ४) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५०(२) प्रमाणे दंड | - | २०००/- |
| एकूण | - | ३,०८,७४,०७८/- |
| ५) या पूर्वी कंपनीकडून अतिक्रमणाकामी वसूल केलेली दंडाची रक्कम | - | १२,०७,४४०/- |
| ६) वसूल केलेली रक्कम वजा जाता कंपनीकडून वसूलीची रक्कम | - | २,९६,६६,६३८/- |

५/- वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेऊन, मे.विक्रम इस्पात कं.लि.साळाव ता.मुरुड जि.रायगड यांनी मौजे-साळाव व निडी ता.मुरुड जि.रायगड येथील वरील परिच्छेद-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे क्षेत्र ९-६९-८० हे.आर. शासकीय जमिनीवर औद्योगिक प्रयोजनासाठी केलेले अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ५१ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम,१९७१ मधील नियम ४३ मधील तरतूदीनुसार वर परिच्छेद -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कंपनीकडून रु.२,९६,६६,६३८/- इतकी रक्कम वसूल करुन पुढील अटी व शर्तीवर अतिक्रमण नियमानुकूल करण्यांत येत आहे.

अटी व शर्ती :-

१) कंपनी सदर जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून धारण करील व शासनाच्या महसूल व वनविभागाच्या पूर्वपरवानगीशिवाय कंपनीला सदर जमिनीचे गहाण/ तारण/ हस्तांतरण/ बक्षीसपत्र करता येणार नाही.

(कृ.पु.पा.)

... सदर जमिनीचा मंजूर प्रयोजनासाठीच वापर करील. शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय अन्य प्रयोजनासाठी जमिनीचा वापर केल्याचे आढळून आल्यास जमीन सरकार जमा करण्यात येईल.

३) कंपनी सदर जमिनीवर करण्यात येणाऱ्या बांधकामाचे आराखडे व नकाशे स्थानिक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेऊन त्यानुसारच बांधकाम करील. स्थानिक प्राधिकरणाच्या मंजूरीशिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

४) विषयाधीन जमिनीचा विकास करण्यापूर्वी कंपनीने सर्व संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्वमंजूरी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

५) उक्त जमिनीपैकी सीआरझेड नियमावलीने बाधीत होणाऱ्या कोणत्याही जमिनीचा विकास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या मान्यतेशिवाय करता येणार नाही. तसेच अशा जमिनीचा वापर विना परवानगी अनधिकृतरित्या केला असल्यास कंपनीने स्वखर्चाने जमीन पूर्वस्थितीत आणावी अन्यथा कंपनीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

६) विषयाधीन जमिनीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्र.२६५७/०९ व रिट याचिका क्र.२६५८/०९ मध्ये जो निर्णय होईल, त्या निर्णयाच्या अधीन राहून सदरचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येत ओह.

७) कंपनीने स्थानिक नियंत्रण विकास नियमावली व प्रादेशिक नगर विकास योजना अन्वये बांधकामास पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच कंपनीने सीआरझेड, पर्यावरण विभाग, गृह विभाग, ग्राम विकास विभाग व संबंधीत विभागाची आवश्यक तेथे पूर्व परवानगी घ्यावी.

८) या जमिनीपैकी काही क्षेत्रावर कंपनीने विना परवानगी बांधकाम केले असल्यास व सदर बांधकाम विकास नियंत्रण नियमानुसार अनधिकृत ठरल्यास, अनुज्ञेय नसलेले बांधकाम कंपनीने स्वतः स्वखर्चाने काढून टाकणे आवश्यक राहील, कंपनीने तशी कार्यवाही न केल्यास, नियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नसलेले बांधकाम काढून टाकण्याची कारवाई केली जाईल.

९) शासनाला शासकीय, निमशासकीय, शासनाचे उपक्रम इत्यादीसाठी भविष्यात सदर जागेची आवश्यकता भासल्यास सदर जमीन शासनास परत करावी लागेल.

१०) मा.अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे आदेश दिनांक १२/९/२००८ मधील अन्य आदेश लागू राहील.

(पृ.पु.पा.)

(१५५)

D:\RB A-3\Encroachments.doc



११) कंपनीने शासन आदेश/नियमांप्रमाणे देय असलेला दरवर्षी अकृषिक आकार उपकरांसह शासन जमा करणे आवश्यक आहे.

१२) वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तींचा कंपनीने भंग केल्यास कोणतीही नुकसान भरपाई कंपनीस अदा न करता जमीन शासन जमा करण्यात येईल.

सही/-
(एच.के.जावळे)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत :१) व्यवस्थापक, मे.वेलस्पन मॅक्स्टील, लि.कंपनी साळाव, ता.मुरुड, जि.रायगड यांना
२) तहसीलदार मुरुड यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी. (चौकशी संचिका ५१ ने ३ सह)
३) उपविभागीय अधिकारी अलिबाग , उपविभाग अलिबाग यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४ यांना माहितीसाठी सादर.
५) मा.प्रधान सचिव (महसूल), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.
६) आदेश संचिकेसाठी.

(अजित नैराळे)
जिल्हाधिकारी रायगड करिता

वाचले :- १) विश्वस्त/सेक्रेटरी, तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट, कोलाड, ता.रोहा यांचे पत्र दि.१२/०१/२०१२, दि.१३/०१/२०१२ तसेच दि.१०/०२/२०१२.
२) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन-२८०९/प्र.क्र.५९/ज-४ दि.०७/०१/२०१०.
३) या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/जमीन/अ-१३/१९४८४९/०९ दि.२०/०१/२०१०.
४) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन-२८०९/प्र.क्र.५९/ज-४ दि.०९/०२/२०१२.
५) शासन, महसूल व वन विभागाकडील सुधारित आदेश क्र. जमीन-२८०९/ प्र.क्र.५९/ज-४ दि.१८/०२/२०१२.
६) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.१८/०२/२०१२.

---

क्र.मशा/जमीन/अ-३/८२२५९/२०१२.
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय,
अलिबाग, दि.१८/०२/२०१२.

## आदेश

२/- उपोद्घांतात अ.क्र.२ कडे नमुद केलेल्या शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दि.७/१/२०१० तसेच उपोद्घांतात अ.क्र.३ कडे नमुद केलेल्या या कार्यालयाकडील दि.२०/०१/२०१० च्या आदेशान्वये तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट कोलाड, ता.रोहा, जि.रायगड या संस्थेस मौजे गोवे, ता.रोहा, जि.रायगड येथील ग.नं.८० एकुण क्षेत्र २०.२३.०४ हे.आ.पैकी ४.८५.६२ हे.आ. (१२ एकर) या जमिनीमधील विधी महाविद्यालय इमारतीसाठी मंजूर केलेली ३ एकर, विधी महाविद्यालय क्रिडांगणासाठी मंजूर केलेली २ एकर व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासाठी मंजूर केलेली २ एकर अशी एकूण मंजूर केलेली ७ एकर जमीन विधी महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण ऐवजी संस्थेस तंत्रनिकेतन (तंत्रशिक्षण अभ्यासक्रम) च्या इमारत बांधकामासाठी ५ एकर व क्रिडांगणासाठी २ एकर अशा जमीन वापर बदलास मान्यता मिळण्यासाठी विश्वस्त / सेक्रेटरी, तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट कोलाड, ता.रोहा यांनी उपोद्घांतात अ.क्र.१ कडे नमुद केलेल्या पत्रान्वये विनंती केली आहे.

३/- संस्थेच्या वरील विनंती प्रमाणे शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार उपोद्घांतात अ.क्र.४ कडे नमुद केलेल्या शासन ज्ञापन दि.०९/०२/२०१२ तसेच उपोद्घांतात अ.क्र.५ कडे नमुद केलेल्या शासन सुधारित आदेश दि.१८/०२/२०१२ अन्वये विधी महाविद्यालय व औदयोगिक प्रशिक्षण केंद्र आणि तंत्रनिकेतन महाविद्यालय ही दोन्ही प्रयोजन शैक्षणिक असल्याने शासन ज्ञापन क्र.जमीन-२८०९/प्र.क्र.५९/ज-४ दि.०७/०१/२०१० द्वारे मंजूर करण्यात आलेली विधी महाविद्यालय व औदयोगिक प्रशिक्षण केंद्र ऐवजी ५ एकर क्षेत्र तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस